आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
गुरुवार, दिनांक १३ जून २०२४

<u>ठळक बातम्या</u>

1. नागपूर शहरालगतच्या धामणा येथे फटाका बनवणाऱ्या कारखान्यात भीषण स्फोट - 6 जणांचा जागीच मृत्यू.

2. एसटी महामंडळातील सर्व विनंती बदल्या आता संगणकीय ॲपव्दारे होणार.

3. मृग बहार आणि आंबिया बहारातील ठराविक फळ पिकांच्या विमा योजनेस राज्य शासनाने दिली मान्यता.

4. विदर्भातील सर्व जिल्ह्यांत तापमानात घट, काही ठिकाणी पावसाची हजेरी.

*****

<u>भीषण स्फोट</u>

नागपूर शहरालगत असलेल्या हिंगणा तालुक्यातील धामणा इथं आज दुपारी फटाका बनवणाऱ्या कारखान्यात भीषण स्फोट झाला. या स्फोटात सहा जणांचा मृत्यू झाला असून 4 जण गंभीर जखमी झाले आहे. त्यांना उपचारासाठी तातडीने नागपुरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हा अपघात आज दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडला. हिंगणा तालुक्यातील धामणा येथे चामुंडा या स्फोटकांची कंपनी कार्यरत आहे. या कंपनीत फटाके दिवे बनवण्याचे काम केले जाते..कारखान्याच्या पॅकेजिंग विभागात दुपारी एकच्या सुमारास आग लागली. तेथे गनपावडर असल्याने मोठा स्फोट झाला असं आमच्या प्रतिनिधीने कळवलं आहे. हा स्फोट झाला तेव्हा तेथे 10 लोक काम करीत असल्याचे सांगण्यात येत आहे. काम करणाऱ्या सहा जणांचा जागेवरच मृत्यू झाला. तर चार जण गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच हिंगणा पोलीस बचाव पथकासह तात्काळ घटनास्थळी पोहोचले. मात्र आग कशी लागली हे अद्याप समोर आलेले नाही. दरम्यान काटोलचे आमदार आणि राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी धामना येथील घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. तर धामण येथील घटना अत्यंत दुर्दुवी असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी समाज माध्यमातून व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी नागपूरमध्ये आयोजित केलेला गडकरींसाठीचा स्वागत उत्सव स्थगित करावा, असं आवाहन देखील त्यांनी केलं आहे. रामटेकचे खासदार शामकुमार बर्वे यांनी देखील घटनास्थळी भेट देऊन दोषींवर ककार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

<u>विधान परिषद निवडणूक</u>

विधान परिषदेच्या ४ जागांसाठी २६ जून रोजी निवडणूक होणार आहे. मुंबई पदवीधर मतदारसंघ, कोकण पदवीधर मतदारसंघ, मुंबई शिक्षक मतदार संघ व नाशिक शिक्षक मतदारसंघ असे या निवडणुकीचे स्वरूप असणार आहे. यातील मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी शिवसेनेने आपला उमेदवार घोषित केला आहे. शिवसेनेतर्फे उमेदवार म्हणून शिवाजी शेंडगे यांचं नाव घोषित करण्यात आलं आहे. शिवसेना सचिव संजय मोरे यांनी मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत त्यांच्या नावाची घोषणा केली.

अजित पवार बैठक

राज्याचा दीर्घकालीन विकास डोळ्यासमोर ठेऊन राज्यात विविध विभागांच्या मार्फत विकासकामे सुरु आहेत. नागरिकांच्यादृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या प्रत्येक प्रकल्पाला आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे. नागरिकांना विकासकामांचा प्रत्यक्ष लाभ होण्यासाठी राज्यात सुरु असलेली, प्रगतीत असलेली आणि प्रस्तावित विकासकामे नियोजनानुसार ठरलेल्या वेळेत गतीने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात झालेल्या उपमुख्यमंत्र्यांच्या प्रकल्प सनियंत्रण कक्षाच्या बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले. बैठकीला महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्याचे मुख्य सचिव डॉ.नितीन करीर यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, जिल्हाधिकारी उपस्थित होते.

खासदार प्रतिभा धानोरकर

वरोरा-भद्रावती विधानसभेच्या आमदार विद्यमान खासदार प्रतिभा धानोरकर यांनी विधानसभेच्या अध्यक्षांकडे राजीनामा सुपूर्द केला. यावेळी खासदार धानोरकर विधानसभा सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानले. त्या सन २०१९ ते २०२४ या कालावधीत विधानसभेच्या आमदार म्हणून निवडून आल्या होत्या. मात्र, नुकत्याच  झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस इंडिया आघाडीच्या उमेदवार म्हणून त्या निवडून आल्याने धानोरकर यांनी आज आपल्या आमदार पदाचा राजीनामा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना सुपूर्द केला.

जरांगे पाटील

सरकारच्या शिष्टमंडळातील खासदार संदीपान भूमरे आणि मंत्री शंभूराज देसाई यांनी आज  जालन्यातील अंतरवाली सराटी  इथं उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे  पाटील यांची भेट घेतली.  जरांगे यांच्याशी झालेल्या चर्चेतून शंभूराज देसाई यांनी 1 महिन्यात 'सगेसोयरे संदर्भातील  मागणीसह जरांगे यांनी सरकार कडे दिलेल्या मागण्यांवर निर्णय होणार असल्याचा शब्द दिला आहे. त्यामुळे जरांगे यांनी आमरण उपोषण स्थगित केलं असून खालावलेल्या तब्येतीमुळे जरांगे यांना  उपचारासाठी छत्रपती संभाजी नगर इथं हलविण्यात आलं  आहे.  यावेळी  सरकार सग्या सोयर्यांच्या कायद्याबद्दल सकारात्मक असून सरकारचे प्रतिनिधी म्हणून 1 महिन्यात या विषयावर निर्णय घेण्याचं आश्वासन मंत्री शंभूराज देसाई यांनी उपस्थित जनसमुदायसमोर दिल.

प्रफुल्ल पटेल

राज्यसभेसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी आज आपला उमेदवारी अर्ज विधानभवनमध्ये दाखल केला. यावेळी पक्षाचे कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, मंत्री छगन भुजबळ आदी उपस्थित होते.

नीट

वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीट च्या समुपदेशनाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा नकार दिला आहे. फिजिक्स कोचिंग इन्स्टिट्यूटच्या अलख पांडेच्या याचिकेवर न्यायालयाने एनटीएला नोटीस बजावली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ८ जुलै रोजी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की समुपदेशन सुरूच राहील आणि आम्ही ते थांबवणार नाही, परीक्षा रद्द करण्याचा निर्णय न्यायालयाने घेतल्यास समुपदेशन आपोआप रद्द होईल, त्यामुळे काळजी करण्याची गरज नाही. सुनावणीदरम्यान एनटीएने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की 12 जून रोजी झालेल्या बैठकीनंतर ज्या 1563 उमेदवारांना सवलतीचे गुण देण्यात आले आहेत त्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागेल तसंच 1563 उमेदवारांना दिलेले ग्रेस मार्क्स रद्द केले जातील.

एसटी महामंडळ बदल्या

एसटी महामंडळामध्ये काम करणाऱ्या चालक-वाहकापासून अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांच्या विनंती बदल्या यापुढे संगणकीय प्रणालीव्दारे ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. यामुळे बदल्यांबाबतचे विविध आक्षेप कमी होणार असून सेवा जेष्ठतेनुसार सर्व कर्मचाऱ्यांना समान न्यायाची हमी या नव्या पध्दतीने शक्य होणार असल्याचं महामंडळाच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. एसटी महामंडळामध्ये चालक-वाहकापासून अधिकाऱ्यांपर्यंत काम करणारे कर्मचारी गंभीर आजारपण, पती-पत्नी एकत्रीकरण, आपापसातील बदली अशा अनेक कारणास्तव विनंती बदलीचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांकडे सादर करतात. परंतु विविध प्रकारच्या हस्तक्षेपामुळे, बदल्यांमध्ये नियमितता येत नाही.

फळपीक विमा योजना

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना सन 2024-25 आणि 2025-26 या दोन वर्षात राबवण्यासंदर्भात राज्य शासनाने मान्यता दिली असून मृग बहार आणि आंबिया बहारातील ठराविक फळ पिकांचा विमा शेतकऱ्यांनी भरून या योजनेत सहभागी व्हावं, असं आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे. या हंगामात राज्यात डाळिंब, संत्रा, मोसंबी, चिकू, पेरू, लिंबू, सीताफळ, द्राक्ष, आंबा, पपई, काजू, स्ट्रॉबेरी व द्राक्ष क इत्यादी पिकांचा फळपीक विमा योजनेत सहभाग करण्यात आला आहे. ही योजना भारतीय कृषी विमा कंपनी, बजाज अलियांज, फ्युचर जनरल आणि युनिव्हर्सल सोम्पो या चार कंपन्यांच्या मार्फत राबविण्यात येणार आहे.

कृषी कारवाही

जादा दराने विक्री करणाऱ्या अकोल्यातील कृषी सेवा केंद्रावर जिल्हा गुणवत्ता नियंत्रण आणि मोहीम अधिकाऱ्यांनी काल कारवाई केली. या प्रकरणी रामदासपेठ पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आल आहे. प्रचलित कापूस वाणाची अकोल्यातील राजस कृषी सेवा केंद्रात जादा दराने बियाणे विक्री सुरू असल्याची माहिती कृषी विभागाच्या पथकाला मिळाली होती. वाणाचे प्रतिपाकीट एक हजार १०० रुपये याप्रमाणे जादा दराने विक्री करताना विक्रेत्याला प्रत्यक्ष पकडण्यात आलं असून या प्रकरणी विविध बियाणे कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## डॉ.दीपक म्हैसकर

नांदेडचे भूमिपुत्र डॉ.दीपक म्हैसकर यांची पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने राज्यस्तरीय पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. यामध्ये सुधाकर नांगनुरे हे सदस्य म्हणून काम पाहणार आहेत. तर राज्याच्या पर्यावरण तथा जलवायू परिवर्तन विभागाचे प्रधान सचिव या समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.

## आषाढी पालखी

आषाढी एकादशी निमित्त गेल्या ५५ वर्षाची परंपरा लाभलेल्या शेगाव ते पंढरपूर हि संत गजानन महाराजांची पालखी आज सकाळी ७:३० वाजता शेकडो वारकऱ्यांसह पंढरपूर कडे प्रस्थान करण्यासाठी निघाली. दरम्यान, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी शेगाव येथे संत श्री गजानन महाराज समाधीचं दर्शन घेऊन पालखी सोहळयास सहभागी झालेल्या वारकऱ्यांशी संवाद साधला.

## हवामान

आगामी काही तासांत अमरावती, यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. मागील २४ तासांत कमाल तापमानात सर्वत्र घट आढळून आली. मात्र हवेतील आर्द्रतेमुळे उकाडा जाणवत राहिला. मागील चोवीस तासांत सर्वाधिक कमाल तापमान गोंदिया इथं ३९ अंश सेल्सिअस नोंदविल गेलं तर नागपुरात ३८ पुर्नाक २ दशांश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद करण्यात आली. दरम्यान, पश्चिम विदर्भातील सर्व जिल्ह्यांत तापमानात घट झाली असून सरासरी तापमान सुमारे ३३ दशांश सेल्सिअस इतकं राहील. १७ जूनपर्यंत सर्वत्र पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. काल पश्चिम विदर्भातील अनेक जिल्ह्यांत पाऊस झाला. अकोला जिल्ह्यात काल सायंकाळी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडला, या वेळी अकोला तालुक्यातील डोंगरगाव येथील एका अल्पभूधारकऱ्याच्या शेतातील एका म्हशीचा वीज पडून मृत्यू झाला तर दोन म्हशी गंभीर जखमी झाल्या आहेत.

## वर्धा कौशल्य

वर्धा जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांतर्गत स्थापन झालेल्या बेरोजगारांच्या सहकारी संस्थाना कंत्राट स्वरुपाची कामे देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक संस्थांनी 25 जुन पर्यंत विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.

## एनटीपीसी मौदा

स्थानिक पातळीवर खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी मौदा बस स्थानकानजीक एनटीपीसी मौदा द्वारा स्पोर्ट कॉम्प्लेक्सची निर्मिती करण्यात येत आहे. कॉर्पोरेट सामाजिक जबाबदाऱ्या अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या या वास्तू मध्ये मैदान, एक बैडमिंटन कोर्ट, एक बास्केटबॉल कोर्ट, एक कुश्ती कोर्ट और एक पैदल ट्रैक असणार आहे.

## टेनिस

टेनिसमध्ये, भारताच्या सुमित नागलने काल इटलीतील पेरुगिया चॅलेंजर टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला तर पुरुष दुहेरीच्या उप उपांत्यपूर्व फेरीमध्ये, भारताचा एन. श्रीराम बालाजी आणि त्याचा जर्मन जोडीदार आंद्रे बेगेमन यांचा सामना आज संध्याकाळी नेदरलँड्सच्या जेस्पर डी जोंग आणि रायन निजबोअर यांच्याशी होईल.

******